## MAHARASHTRA ACT No. XXV OF 1972

### THE MAHARASHTRA LAND REVENUE (REVIVAL OF CERTAIN RULES RELATING TO NON-AGRICULTURAL ASSESSMENT) ACT 1972,

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २६ ऑगष्ट १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXV OF 1972

### AN ACT TO PROVIDE FOR REVIVAL OF CERTAIN RULES RELATING TO THE LEVY OF NON-AGRICULTURAL ASSESSMENT ON LANDS IN THE STATE

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात,** दिनांक ३१ ऑगस्ट १९७२रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५

### राज्यातील जमिनींवर अकृषिक आकारणी बसविण्याशी संबंधित असलेल्या काही विशिष्ट नियमांच्या पुन:प्रवर्तनाची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (या अधिनियमात यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याचे कलम ३३६ हे त्यात नमूद केलेले विधी रद्द करीत असले तरी त्याच वेळी, त्या कलमात नमूद केलेले तिसऱ्या परंतुकातील कोणतेही नियम, आकारणी आणि विविध इतर बाबी धरून (अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या विधींन्वये) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई यांच्या प्रवर्तनास संरक्षण देत आहे ; आणि तदनुसार, त्या परंतुकाद्वारे अशी तरतूद करण्यात आली आहे की, उक्त अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई याद्वारे त्यांचे अधिक्रमण करण्यात आले नसेल तोवर आणि अधिक्रमण करण्यात येईतोपर्यंत, उक्त गोष्ट किंवा कारवाई अंमलात असण्याचे चालू राहील ;

**आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र** (भाग चार-ब, पृष्ठ १०८६) यामध्ये प्रसिद्ध झालेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ. १९६७-आर, दिनांक २५ जुलै १९६९ याद्वारे, दिनांक २५ जुलै १९६९ रोजी करण्यात आलेले आणि अंमलात आणण्यात आलेले महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल आणि अकृषिक आकारणी) नियम, १९६९ याद्वारे, उपरोक्त कलम ३३६ द्वारे रद्द करण्यात आलेल्या विधींन्वये करण्यात आलेल्या आणि त्या कलमाच्या, उपरोल्लिखित तिसऱ्या परंतुकाच्या आधारे अंमलात असण्याचे चालू राहिलेल्या सर्व पूर्वीच्या नियमांचे अधिक्रमण होत असल्याचे अभिप्रेत आहे ;

आणि ज्याअर्थी, पूर्वीच्या सर्व नियमांचे अधिक्रमण झाल्याने, राज्यातील काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये सध्या कोणतेही प्रमाण दर अस्तित्वात राहिलेले नाहीत आणि आता करण्यात आलेल्या आणि अमलात असलेल्या नवीन नियमांस अनुसरून सर्व क्षेत्रांमध्ये अद्याप प्रमाण दर निश्चित करण्यात आलेले नाहीत; व त्याचा परिणाम म्हणून, ज्यांचे अधिक्रमण करण्यात आले आहे अशा जुन्या नियमांन्वये तसेच विविध कारणांमुळे ज्यान्वये प्रमाण दर अद्याप निश्चित करण्यात आलेले नाहीत, अशा नवीन नियमांन्वयेही, त्या क्षेत्रांच्या, संबंधात, अकृषिक आकारणी निर्धारित करणे शक्य झालेले नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील जमिनीवरील अकृषिक आकारणी निर्धारित करणे किंवा ती बसविणे या गोष्टीशी जे संबंधित आहेत अशा अधिक्रमित केलेल्या नियमांचे (आणि आदेशांचे) आणि विशेषत: प्रमाण दर निर्धारित करणारे जे कोणतेही नियम व आदेश आहेत त्यांचे पुन: प्रवर्तन करणे आवश्यक व इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

संक्षिप्त नाव आणि प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (अकृषिक आकारणीशी संबंधित विशिष्ट नियमांचे पुन:प्रवर्तन) अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेपासून अमलात येईल.

अकृषिक आकारणीशी संबंधित नियमांचे पुन:प्रवर्तन. २. महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ (ज्यांना यात यापुढे "नवीन नियम" असे संबोधण्यात आले आहे) हे तयार करण्यात येऊन अमलात आणल्यामुळे (महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम ३३६ च्या तिसऱ्या परंतुकाच्या आधारे जे अमलात असण्याचे चालू राहिले होते अशा) सर्व नियमांचे अधिक्रमण करण्यात आले असले आणि परिणामी तदन्वये निश्चित करण्यात आलेले राज्यातील जमिनीवरील अकृषिक आकारणीचे दर रद्द झाले असले तरी, याद्वारे अशी तरतूद करण्यात येत आहे की, जेथे कोणतेही प्रमाण दर राहिलेले नाहीत आणि नवीन नियमांद्वारे किंवा तन्वये अद्यापि नवीन प्रमाण दर निश्चित करण्यात आलेले नाहीत किंवा जेथे प्रमाण दर राहिलेले आहेत परंतु नवीन नियमांद्वारे सर्व नियमांचे अधिक्रमण करण्यात येण्यापूर्वी, उक्त प्रमाण दरानुसार आकारणी निश्चित करण्यात आलेली नाही, अशा राज्यातील क्षेत्रांमध्ये,—

(अ) राज्यातील कोणत्याही जमिनीच्या अकृषिक आकारणीच्या निर्धारणाशी आणि ती बसविण्याशी संबंध येतो तेथवर, सर्व नियम आणि आदेश आणि या प्रयोजनाशी परिणामरूप, आनुषंगिक किंवा पूरक असलेल्या सर्व तरतुदी ; आणि

(ब) विशेषत: उक्त नियम आणि आदेश यान्वये निश्चित केलेले कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे अकृषिक आकारणीचे दर (मग ते आकारणीचे प्रमाण दर असोत, आकारणीचे विशेष दर असोत किंवा अन्य कोणतेही दर असोत) आणि तदन्वये किंवा त्यास अनुसरून करण्यात आलेली सर्व आकारणी ;

या गोष्टी कधीही अधिक्रमित किंवा रद्द झाल्याचे समजण्यात येणार नाही; आणि ते तसेच चालू राहतील आणि चालू असल्याचे समजण्यात येईल आणि उपरोक्त तिसऱ्या परंतुकाच्या भावार्थानुसार ते पूर्णत: प्रभावशील असतील; आणि तदनुसार, उक्त नियम आणि आदेश व अकृषिक आकारणीचे दर यांचे कधीही अधिक्रमण करण्यात आले नव्हते किंवा ते कधीही रद्द करण्यात आले नव्हते असे समजून, अशा रीतीने निश्चित करण्यात आलेल्या किंवा उक्त नियम आणि आदेश यांस अनुसरून निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार, राज्यातील कोणत्याही जमिनीवरील अकृषिक आकारणी निर्धारित करता येईल आणि ती बसविता येईल व ती वैधरीत्या निर्धारित करण्यात आणि बसविण्यात आल्याचे समजण्यात येईल किंवा ती निर्धारित करून व बसवून वसूल करण्याचे चालू ठेवणे हे वैध असल्याचे समजण्यात येईल.

राज्यातील कोणत्याही जमिनीवरील अकृषिक आकारणी निर्धारित करण्याच्या किंवा ती बसविण्याच्या संबंधात अधिक्रमित केलेल्या नियमांस आणि आदेशांस अनुसरून केलेली कोणतीही कार्यवाही किंवा केलेली कृति ही, आणि त्या नियमांन्वये किंवा त्यास अनुसरून निश्चित केलेल्या प्रमाण दराने केलेली, बसविलेली किंवा केल्याचे, बसविल्याचे आणि वसूल केल्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही आकारणी ही वैधरीत्या करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि जे अधिक्रमित किंवा रद्द करण्यात आले आहेत अशा नियमाखालील आणि आदेशाखालील नियमानुसार किंवा प्रमाण दरानुसार अशी आकारणी करण्यात आली होती किंवा करण्यात आली आहे याच केवळ कारणावरून कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे त्यावर आक्षेप घेता येणार नाही.

या अधिनियमाद्वारे पुन:प्रवर्तित करण्यात आलेले व चालू ठेवण्यात आलेले अधिक्रमित नियम व आदेश हे (प्रमाण दर आणि आकारणी धरून) उक्त अधिनियमाच्या कलम ११६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीपर्यंत किंवा नवीन नियमान्वये निश्चित केलेल्या आकारणीच्या नवीन प्रमाण दरानुसार अकृषिक आकारणी अमलात येईतोपर्यंत, यापैकी जी नंतरची असेल त्या मुदतीपर्यंत अमलात असण्याचे चालू राहतील.

(यथार्थ अनुवाद)

के. शा. आराध्ये,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.